महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
पुणे विभागीय मंडळ, पुणे -४११००५

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Pune Divisional Board, Pune - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

Email sscboardpune@gmail.com
Website : www.sscboardpune.in

कालमर्यादित/तातडीचे

क्रमांक - पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.ह./ 1272
दिनांक : २०/०२/२०२५.
२९

प्रति,

१.शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, पुणे, अहमदनगर , सोलापूर.
२. सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/ उच्च माध्यमिक शाळा/ क.महाविद्यालय

विषय - **सन २०२३ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ.१०वी व इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांचा परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेकरीता उर्वरित विद्यार्थ्यांचे बॅक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल दि. १८ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत उपलब्ध असल्याबाबत.**

संदर्भ १. क्र.पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.हं./४१८१ दि.०५ ऑगस्ट २०२४
२. क्र.पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.हं./६५१४ दि.१२ डिसेंबर २०२४
३. क्र.पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.हं./६०१३ दि.१२ नोव्हेंबर २०२४
४. क्र.पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.हं./६३६ दि.२४ जानेवारी२०२५
५. क्र.पुविमं/लेखा-३/दुष्काळ ख.हं./७९२ दि.५/६ फेब्रुवारी २०२५
६.क्र.रा.मं./सन२०२३ दुष्काळ ख हं/४३९ दि.३१ जानेवारी २०२५
७. क्र.रा.मं./सन२०२३ दुष्काळ ख हं/७०५,दि.१८ फेब्रुवारी २०२५

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय दि.०१/०८/२०१९ व शुध्दीपत्रक दि.०३/०२/२०२० अनुसार, सन २०२३ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा राज्यमंडळ कार्यालयाकडून विद्यार्थी पालकांच्या आधार संलग्न बँक खात्यात वर्ग करण्यात येत आहे. तांत्रिक अडचणीमुळे पात्र विद्यार्थी फी परताव्याच्या लाभापासून वंचित राहू नये म्हणून उर्वरित २५८८९९ विद्यार्थ्यांचे बॅक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल दि.०३ फेब्रुवारी ते दि.१४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत राज्य मंडळ कार्यालयाकडून उपलब्ध करुन दिल्याबाबत संदर्भाधीन पत्र क्रमांक ५ अन्वये कळविण्यात आले होते. तसेच **<u>शासनकडून उपलब्ध झालेल्या निधीचा विनीयोग आर्थिक वर्ष २०२४ -२५ संपण्यापूर्वी दि.३१ मार्च २०२५ अखेर होणे आवश्यक असल्याचे कळविण्यात आले होते.</u>**

निर्धारीत मुदतीत पुढील तपशीलात नमुद केल्याप्रमाणे इ.१० वी चे ६९५३ व इ. १२ वी चे ३१४० विद्यार्थ्यांचे बॅक खाते तपशील व इतर अनुषंगिक माहिती संबंधीत माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन पार्टलर भरलेली आहे.

| परीक्षा | प्रलंबित विद्यार्थी | माहिती भरलेली विद्यार्थी | शिल्लक विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| इ.१० वी | १६२७४० | ६९५३ | १५५७८७ |
| इ.१२ वी | ९६१५९ | ३१४० | ९३०१९ |
| एकूण | २५८८९९ | १००९३ | २४८८०६ |

इ. १० वी चे १५५७८७ विद्यार्थ्यी तसेच इ.१२ वी चे ९३०१९ विद्यार्थ्यांना अद्याप परीक्षा फी परतावा देणे अद्याप बाकी आहेत, अशा त्रुटींची पुर्तता करुन निर्धारीत कालावधीत ऑनलाईन पोर्टलवर सुधारित माहिती सादर करण्याकरीता संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून सुचित करण्यात यावे.

परिक्षा शुल्क परतावा करणेकरीता पात्र विद्यार्थ्यांचे आधार लिंक असलेले बँक खाते तपशील, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड इ.माहितीमध्ये दुरुस्ती/ सुधारित माहिती सादर करण्याकरीता **ऑनलाईन पोर्टल दि. १८ फेब्रुवारी** ते २८ फेब्रुवारी **२०२५ या कालावधीत सुरु करण्यात येत आहे.**

सन २०२३-२४ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काहसदृश्य भागातील इ.१० व इ.१२ वीच्या परीक्षा शुल्क परतावा प्रलंबित असलेल्या एकुण २४८८०६ विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक तपशील व इतर माहिती दुरुस्ती सुधारित करण्याकरीता आपल्या कार्यक्षेतील संबंधीत माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांना अवगत करावे. सदर माहिती त्वरीत अदययावत करावी, अन्यथा होणा-या विलंबास आपण जबाबदार राहाल, तसेच **ऑनलाईन पोर्टल दि. १८ फेब्रुवारी** ते २८ फेब्रुवारी **२०२५ या कालावधीत दुरुस्ती करिता सुरु करण्याची अंतिम संधी राहिल.** याची नोंद घ्यावी.

**सोबत, संदर्भीय पत्र**

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव
**पुणे** विभागीय मंडळ,
पुणे ४११००५.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.